महात्मा गांधी विद्यामंदिर संचालित

**लोकनेते व्यंकटराव हिरे कला, वाणिज्य आणि**

**विज्ञान महाविद्यालय पंचवटी नाशिक**

**पुणे विद्यापीठ संलग्न क्र पी.यू/एन.एस/ए.एस.सी/०१८(१९७१)**

(NAAC Reaccredited at '**A**' Level with CGPA 3.01)

Web site : www.lvhcollege.com * E-mail: lvhcollege@gmail.com



**ग्रंथालय विभाग**

दिनांक २३/०६/२०२०

# ग्रंथालय वार्षिक अहवाल २०१९-२०

ग्रंथालयाच्या माद्यमातून महाविद्यालायात वाचन संस्कृती रुजविणे, विकसित करणे व उच्च वाचनाभिरुची निर्माण करून त्या व्दारे सक्षम, सुजाण व विचारी विद्यार्थी घडविण्याचे कार्य ग्रंथालय विभागाच्या वतीने होत असते. “बहुजन हिताय बहुजन सुखाय” हे ब्रीद घेऊन बहुजनांचा सर्वांगीण विकास साधण्यासाठी कठीबद्ध असलेली नाशिक जिल्ह्यातील अग्रगण्य शैक्षणिक संस्था म्हणजे महात्मा गांधी विद्यामंदिर होय. विद्यार्थ्यांच्या शैक्षणिक, सामाजिक गरजा लक्षात घेऊन संस्कृती विषयक विचार कसे प्रगल्भ होतील याकडे विषेश लक्ष दिले जाते. महाविद्यालयातील विद्यार्थी ज्ञानाविषयी आस्था व वाचनाची अभिरुची निर्माण व ज्ञानप्रसार यांच्याव्दारे विद्यार्थ्यांचा सर्वांगीण सास्कृतिक विकास घडवून आणणे.

विद्यार्थी हिताचा विचार करून महाविद्यालयातील ग्रंथालय विभाग चैतन्यशील आणि तेजस्वी ठेवण्यासाठी महाविद्यालयातील सर्वच सदैव प्रयत्नशील असतो. त्यासाठी माहिती संप्रेषण तंत्रज्ञानाच्या माध्यमातून माहिती तंत्रज्ञानातील विकास व माहितीचा विस्फोट यांना सामावून घेत ग्रंथालयांना टिकून राहायचे आहे. आणि भविष्यात होणाऱ्या बद्दला कडे वाटचाल करावयाची आहे. यासाठी ग्रंथालय कसे सुसज्ज आणि परिपूर्ण होईल याकडे जास्तीत जास्त लक्ष दिले जाते. त्यासाठी कला, वाणिज्य, विज्ञान आणि बी. व्होकेशनल विषयावरील दर्जेदार पुस्तके, आत्मचरित्रे, धर्मकोश, विश्वकोश इअरबुक, डिक्शनरी, निरनिराळया विषयावर ग्रंथ उपलब्ध आहेत. पुस्तकांबरोबरच मासिके, नियतकालिके आणि जर्नल्स उपलब्ध आहेत. स्थापनेपासून ते आज घडीला ग्रंथालयात खालील प्रमाणे ग्रंथसंख्या उपलब्द आहे.

**ग्रंथालयात उपलब्ध असलेल्या वाचन साहित्याचा तपशिल.**

| अ.नं. | विवरण | मागील ग्रंथांची संख्या | चालू वर्षातील वाढ | एकूण |
|---|---|---|---|---|
| १ | विकत घेतलेली ग्रंथ | | | |
| | १.वरिष्ठ विभाग | ४९१९७ | २५२ | ४९४४९ |
| | २. वरिष्ठ पी.बी.एफ. | ७११८ | ० | ७११८ |
| | ३.कनिष्ठ विभाग | १४२५५ | २६ | १४२८१ |
| | ४. कनिष्ठ पी.बी.एफ.. | ४८५९ | ० | ४८५९ |
| | ५.व्यवसाय शिक्षण विभाग आणि इतर | १०७७३ | ० | १०७७३ |
| | ग्रंथसंख्या | ८६२८२ | २७८ | ८६५६० |
| २ | प्रबंध व लघुप्रबंध | ०५ | - | ०५ |
| ३ | नियतकालिकांचे बांधीव खंड | ५५७ | - | ५५७ |
| ४ | सीडी व डीव्हीडी | २४५ | - | २४५ |

| | | | | |
|---|---|---|---|---|
| | एकूण | ८०७ | - | ८०७ |
| ५ | रद्दबातल ग्रंथसंख्या<br>१. वरिष्ठ विभाग<br>२. वरिष्ठ पी.बी.एफ.<br>३. कनिष्ठ विभाग<br>४. कनिष्ठ पी.बी.एफ..<br>५. व्यवसाय शिक्षण विभाग आणि इतर | <br>४१६१<br>१४६८<br>३४९९<br>२८२४<br>०२ | <br>-<br>-<br>-<br>-<br>- | <br>४१६१<br>१४६८<br>३४९९<br>२८२४<br>०२ |
| ६ | इतर (बुक बँक/ गुणवत्ता विकास / कनिष्ठ एस. अे. एफ./ वरिष्ठ एस. अे. एफ./ एम. एस.डब्लू / के.बी.एच.इजिनि./ व्यवसाय शिक्षण मार्गदर्शन कोर्स ) | ६४५५ | -<br>- | ६४५५ |
| | एकूण | **१८४०९** | **-** | **१८४०९** |
| **ग्रंथालयात उपलब्ध असलेल्या ग्रंथांची संख्या** | | **६८१५१** | | |
| ७ | नियतकालिके<br>१. वर्गणीतून खरेदी केलेली<br>२. ई-जर्नल्स<br>३. ई-बुक्स | <br>१०१<br>२१००<br>५१०० | <br>००४<br>६०००<br>३१३५००० | <br>१०५<br>६०००<br>३१३५००० |

**ग्रंथालयातील सभासद संख्या**

| अ.नं. | ग्रंथालयातील सभासद संख्या | विद्यार्थी | शिक्षक | |
|---|---|---|---|---|
| १ | वरिष्ठ विभाग ( अनुदानित आणि विनाअनुदानित) | ३३१० | ७२ | |
| २ | वरिष्ठ विभाग (विनाअनुदानित) पदव्युत्तर सत्र | ९२८ | | |
| ३ | कनिष्ठ विभाग ( अनुदानित आणि विनाअनुदानित) | ३८८५ | ३० | |
| ४ | शिक्षकेत्तर कार्मचारी( अनुदानित आणि विनाअनुदानित) | | ६२ | |
| | **ग्रंथालयातील एकूण सभासद संख्या** | ८१२३ | १६४ | |

**माहिती साक्षरतेचा उपक्रम :** माहिती संप्रेषण तंत्रज्ञानाच्या युगात माहिती ही विविध स्वरूपात मुबलकपणे उपलब्ध होत आहे. त्या माहितीच्या प्रवाहातून नेमकी माहिती मिळविणे व ती योग्य प्रकारे वापरणे, यासाठी विशेष कौशल्याची गरज भासत आहे. अशा माहितीच्या बाबतीत चौकस असणे, साक्षर असणे गरजेचे झाले आहे. त्या उद्देशाने महाविद्यालयाचा विद्यार्थी माहिती साक्षर व्हावा यासाठी ग्रंथालय विभागात १० संगणकासह इंटरनेट सुविधा असलेली सुसज्ज प्रयोगशाळा ई-रिसोर्स च्या वापरासाठी महाविद्यालयातील विद्यार्थी संशोधक व प्राध्यापक लाभ घेतात.

**नियतकालिके :** विविध विषयावरील ग्रंथसंख्या हे जसे ग्रंथालयातील महत्वाचे अंग आहे. त्याच प्रमाणे नियातकालिके सुद्धा ग्रंथालायाचे महत्वाचे अंग आहे. नियातकालीके हा ताज्या माहितीचा प्रवाह असतो. त्यामध्ये आद्ययावत माहिती मिळते. ही माहिती आमच्या विद्यार्थी व शिक्षकांना मिळावी म्हणून ग्रंथालयात वेगवेगळ्या विषयावरील राष्ट्रीय व आंतरराष्ट्रीय स्तरावरील इंग्रजी, मराठी व हिंदी भाषेतील एकूण १०५ नियतकालिके आणि जर्नल्स खरेदी केली जातात. शैक्षणिक वर्षात ६००० ऑनलाईन ई-जर्नल्स आणि ३१३५००० ई-बुक्स चे दरवर्षी नूतनीकरण करून ग्रंथालय सभासदांना उपलब्द करून देण्यात येते. प्रिंट आणि ई-जर्नल्स आणि ई-बुक्स ई. करिता वर्षभरासाठी वार्षिक वर्गणी स्वरूपात वर्गणी पाठवली जाते.

**दैनिक :** शिक्षक व विद्यार्थी यांना दररोजच्या घडामोडीची माहिती मिळावी या करिता मराठी, इंग्रजी आणि हिंदी भाषेतील २० दैनिक वर्तमान पेपर ग्रंथालय विभागात उपलब्ध करून देण्यात आली. त्यासाठी दरमहा रु. ३००० (तीन हजार रुपये) एवढा खर्च केला जातो.

**कात्रण सेवा** : महाविद्यालयाची प्रतिमा अधिक स्पष्ट होण्यासाठी ग्रंथालय विभागातून महाविद्यालयात राबविलेल्या उपक्रमांची माहिती किवां माहितीच्या स्वरूपातील बातमी प्रसिद्ध केली जाते. त्या प्रसिद्ध बातमीचे कात्रण सर्वांसाठी वाचावयास उपलब्ध करून दिले आहे.

**फेसबुक सेवा / वाट्सअप** : महाविद्यालात विविध शैक्षणिक उपक्रम आयोजित केली जातात त्या सर्व उपक्रमाची माहिती सोशल नेट्वर्किंगच्या माध्यमातून वर्तमान पेपर, फेसबुकवर आणि **वाट्सअप वर** प्रसिद्ध केली जाते. जेणेकरून महाविद्यायालयाची प्रतिमा अधिक स्पष्ट होण्यास मदत होते.

**आंतर ग्रंथालयीन देवघेव सेवा :** महाविद्यालायातील विद्यार्थी व प्राध्यापकांना आपल्या विषयासंबधी पुस्तक ग्रंथालयात उपलब्द नसेल अशा वेळी खालील ग्रंथालयाचे सभासदत्व घेण्यात आले आहे.

१. डेलनेट (डेव्हलोपिंग लायब्ररी नेटवर्क ) चे सभासद, दिल्ली.

२. महात्मा गांधी विद्यामंदीर फार्मसी महाविद्यालय, नाशिक

३. महात्मा गांधी विद्यामंदीर संचलित, पंचवटी कॉलेज ऑफ मॅनेजमेंट अँड कॉम्पुटर सायन्स नाशिक

**ग्रंथालयाची सुरक्षितता** : ग्रंथालय विभागातील साहित्य सुरक्षिततेच्या दृष्टीने ग्रंथालय बिभागाचा बासस्ट लाख रुपये चा विमाचे नूतनीकरण करण्यासाठी वार्षिक प्रीमियमपोटी ३००० रू. खर्च करण्यात आली.

**देणगी निधी :** यावर्षी मा. श्री. जगन्नाथ दगा मराठे सेवानिवृत्त प्राचार्य डी. एड. कॉलेज, मालेगाव यांनी आपल्या महाविद्यालयाच्या ग्रंथालयाला रूपये १८१५/- किमतीची स्वत: लिहिलेली ग्रंथ संपदा भेट/देणगी स्वरूपात दिली. महाविद्यालय प्रशासनाच्या वतीने मा. श्री. जगन्नाथ दगा मराठे रांचे ग्रंथ संपदा भेट दिल्याबद्दल आपणा सर्वांचे महाविद्यालयाच्या वतीने अभिनंदन व ग्रंथालय विभागाच्या वतीने शतशः आभार!

**कोविड-१९ :-** कोविड-१९ दरम्यान विभागाकडून ग्रंथालय पोर्टल (वेबसाईट) तयार करून वाचन साहित्याच्या फ्री लिंक्स उपलब्ध करून देण्यात आल्या. व टेलिग्राम ग्रुपच्या माध्यमातून विद्यार्थ्यांना लिंक व अध्ययन व अध्यापनासाठी लागणारे साहित्य उपलब्ध करण्यासाठी प्रयत्न करण्यात आले.

**आभार :** महाविद्यालयाच्या ग्रंथालय विभागातील सेवा व सुविधा समृद्ध व अद्ययावत करण्यासाठी संस्थेचे विशवस्त व अध्यक्ष महाविद्यालयाचे प्राचार्य मा. चंद्रकांत जी. दिघावकर व ग्रंथालय समितीचे सदस्य व माझे सर्व सहकारी आणि विद्यार्थी यांच्या सर्वांच्या मार्गदर्शनामुळे व सहकार्याने ग्रंथालयाची प्रगती होत आहे. मनापासून सर्वांचे आभार व्यक्त करतो.

ग्रंथालय विभाग प्रमुख

## ग्रंथालय समिती

| अं. न. | ग्रंथालय समिती सदस्य | |
|---|---|---|
| १. | प्राचार्य डॉ. सी. जी. दिघावकर | अध्यक्ष |
| २. | उपप्राचार्य डॉ. अ. व्ही. पाटील | सदस्य |
| ३. | प्रा. डॉ. एन. बी. पवार | सदस्य |
| ४. | प्रा. डॉ. विनीत एच. रकिबे | सदस्य |
| ५. | प्रा. डॉ. के. आर. निकम | सदस्य |
| ६. | प्रा. डॉ. के. एन. पिंगळे | सदस्य |
| ७. | प्रा. एस. पी. व्याळीज | सचिव |
| ८. | श्री. पी. डी. झालसे | सदस्य |
| ९. | श्री. एस. एन. शेलार | सदस्य |

## सोबत: ग्रंथालय विभागाला भेट दिलेल्या मान्यवरांचे फोटो



सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठतील ज्ञान संसाधन केंद्राचे संचालक मा. डॉ. राजेंद्र कुंभार मा. डॉ. सदानंद बनसोडे, नामपूर महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. राजेंद्र भामरे, के. टी. एच. एम. महाविद्यालयाचे ग्रंथपाल प्रा. शरद पाटील, महाविद्यालयाचे ग्रंथपाल प्रा. एस. पी. व्याळीज सहा. ग्रंथपाल एस. एन. शेलार व आदी मान्यवर.



संशोधन केंद्राच्या मान्यतेसाठी सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठ समितीची ग्रंथालय विभागाला भेट याप्रसंगी अध्यक्ष मा. प्राचार्य डॉ. रंगनाथ आहेर पारनेर महाविद्यालय, समिती सदस्य प्रा. डॉ. के. एन. गायकवाड, प्रा. केंद्रे सुभाष धोंडीबा, सदस्य प्रा. गायकवाड प्रविणकुमार बी., सदस्य अंधारे पी. जी. महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. सी. जी. दिघावकर, सिनेट सदस्य डॉ. नंदू पवार, ग्रंथपाल प्रा. एस. पी. व्याळीज व आदि मान्यवर.



डॉ. बाबासाहेब आंबेडकर मराठवाडा औरंगाबाद विद्यापीठ ज्ञान संसाधन केंद्राचे संचालक मा. डॉ. धर्मराज के. वीर, महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. सी. जी. दिघावकर, ग्रंथपाल प्रा. एस. पी. व्याळीज



“वाचन प्रेरणा” दिनाचे औचित्य साधून व भारताचे माजी राष्ट्रपती डॉ. ए. पी. जे. अब्दुल कलाम यांचा जयंतीनिमित्त मा. प्राचार्य डॉ. सी. जी. दिघावकर यांच्या समवेत उपप्राचार्य डॉ. संतोष चोबे, विज्ञान शाखा प्रमुख डॉ. एस.डी. पाटील, ग्रंथपाल प्रा. संभाजी व्याळीज व सहा. ग्रंथपाल श्री. एस. एन. शेलार.



मा. श्री. जगन्नाथ दगा मराठे सेवानिवृत्त प्राचार्य डी. एड. कॉलेज, मालेगाव यांनी आपल्या महाविद्यालयाच्या ग्रंथालयाला स्वत: लिहिलेली ग्रंथ संपदा भेट स्वरूपात दिली. याप्रसंगी ग्रंथ संपदेचा स्वीकार करतांना प्राचार्य डॉ. सी. जी. दिघावकर श्री. अशोक हिरे प्रा. डी. एस. शिंदे व ग्रंथपाल प्रा. एस. पी. व्याळीज.



कनिष्ठ विभागाच्या विद्यार्थीनी समवेत ग्रंथपाल प्रा. एस. पी. व्याळीज

## प्रसिद्धी विभागाचा अहवाल :

शैक्षणिक वर्ष २०१९-२० मध्ये प्रसिद्धी समितीने महाविद्यालया संदर्भात वर्ष भरात झालेल्या विविध उपक्रमांच्या बातम्या विविध वर्तमानपत्रातून प्रसिद्धी दिली. असुन त्या संदर्भातील काही निवडक बातम्या आपल्या अवलोकनार्थ जोडलेल्या आहेत.

प्रा. एस .पी. व्याळीज



पंचवटी : लोकनेते व्यंकटराव हिरे महाविद्यालयात रंगलेल्या राष्ट्रीय वादविवाद स्पर्धेचा पारितोषिक वितरण समारंभ बुधवारी मान्यवरांच्या उपस्थितीत पार पडला.

# मसगा महाविद्यालयाला विजेतेपद

## वैयक्तिक गटात पुण्याचा जयंत काटकर विजेता

### » राष्ट्रीय वादविवाद स्पर्धा

**सकाळ वृत्तसेवा**

पंचवटी, ता. ११ : नागरिकत्व सुधारणा कायद्याची गरज आहे की नाही, या विषयावर घेण्यात आलेल्या वादविवाद स्पर्धेचे विजेतेपद मालेगावच्या महाराजा सयाजीराव गायकवाड महाविद्यालयाने पटकावले. वैयक्तिक गटात पुण्याच्या जयंत काटकरने प्रथम क्रमांकासह पन्नास हजारांचे पारितोषिक पटकावले.

कर्मवीर भाऊसाहेब हिरे महाविद्यालयातर्फे मंगळवार (ता.१०)पासून दोनदिवसीय राष्ट्रीय महाविद्यालयीन वादविवाद स्पर्धा झाली. स्पर्धेचे पारितोषिक वितरण बुधवारी (ता.११) झाले. संस्थेचे जनरल सेक्रेटरी डॉ. प्रशांत हिरे अध्यक्षस्थानी होते. सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठाचे कुलगुरू डॉ. नितीन करमळकर, 'देशोन्नती'चे संपादक प्रकाश पोहरे, डॉ. अपूर्व हिरे प्रमुख पाहुणे होते. या वेळी मार्गदर्शन करताना श्री. पोहरे यांनी भारतीय नागरिकत्व कायदा हा काही आत्ताच तयार झालेला कायदा नाही. अनेक वर्षांपासून हा कायदा प्रलंबित आहे. पण या कायद्यासंदर्भात संभ्रम निर्माण करून या कायद्याचे भांडवल करून राजकीय पक्ष संधिसाधूपणा करत आहेत. खरंतर यापेक्षाही देशातील इतर महत्त्वाच्या प्रश्नांना सोडणे क्रमप्राप्त असल्याचे त्यांनी सांगितले.

### स्पर्धेचा निकाल असा

- इंग्रजी भाषा : प्रथम- जान्हवी पंजाबी (एसएमआरके महाविद्यालय, पाच हजार रुपये रोख आणि स्मृतिचिन्ह), द्वितीय- करण पारीक (रायसोनी महाविद्यालय, नागपूर, तीन हजार रुपये रोख आणि स्मृतिचिन्ह), तृतीय- अंकित सावंत (एमपी लॉ कॉलेज, औरंगाबाद, १५०० रुपये रोख आणि स्मृतिचिन्ह), चतुर्थ- अर्पिता टिपरीवाला (एसएमआरके महाविद्यालय, १०० रुपये रोख आणि स्मृतिचिन्ह), पाचवा- प्राजक्ता पटवे (टीएमव्ही कॉलेज, पुणे, ५०० रुपये रोख, स्मृतिचिन्ह).
- हिंदी भाषा : प्रथम- साक्षी मराठे (एसपी महाविद्यालय, पुणे, पाच हजार रोख आणि स्मृतिचिन्ह), द्वितीय- नाबी हसन (जामिया विद्यापीठ, तीन हजार रोख आणि स्मृतिचिन्ह), तृतीय- मनीष झा (जेएमएस लॉ कॉलेज, नोएडा, दोन हजार रोख आणि स्मृतिचिन्ह), चतुर्थ- मुस्तफा (आर्टस कॉलेज, मालेगाव, एक हजार रुपये रोख आणि स्मृतिचिन्ह), पाचवा- रवी मिश्रा (लोकनेते व्यंकटराव हिरे महाविद्यालय, रोख पाचशे रुपये आणि स्मृतिचिन्ह).
- मराठी भाषा : प्रथम- वृषभ चौधरी (जीएमडी कॉलेज, सिन्नर), द्वितीय- महेश अहिरे (एमएसजी महाविद्यालय, मालेगाव), तृतीय- प्रसाद जगताप (विद्यावर्धिनी महाविद्यालय, धुळे), चतुर्थ- कल्पेश मोहाडा (श्री शिवाजी कॉलेज, अमरावती), पाचवा- धर्मेश हिरे (विद्यावर्धिनी महाविद्यालय, धुळे).
- वैयक्तिक उत्कृष्ट पारितोषिक विभाग : प्रथम- जयंतकुमार काटकर (एमएसडब्ल्यू इन्नु महाविद्यालय, पुणे, पन्नास हजार रुपये रोख आणि स्मृतिचिन्ह), द्वितीय- संदीप गवळी (एमएसजी कॉलेज, मालेगाव, २५ हजार रुपये रोख आणि स्मृतिचिन्ह), तृतीय- प्रकाश चंदन (जामिया विद्यापीठ, दिल्ली, ११ हजार रुपये, स्मृतिचिन्ह).

आपलं महानगर

# इंटरनेट नव्हे महाविद्यालयांत घडतात सक्षम विद्यार्थी

## ■ डॉ. नितीन करमळकर : हिरे महाविद्यालयात राष्ट्रीय वादविवाद स्पर्धेचे पारितोषिक वितरण



**आडगाव** ● सध्याच्या शिक्षण पद्धतीत शिक्षकांनी विद्यार्थ्यांना अपेक्षित ज्ञान देणे आणि उद्याचा एक सक्षम तरुण तयार करणे ही काळाची गरज आहे. गुगलवर मिळणारी माहिती म्हणजे ज्ञान नसून त्यासाठी शाळा कॉलेज अत्यंत गरजेचे आहे. सक्षम विद्यार्थी घडवण्यात शिक्षण संस्थांचा महत्त्वाचा वाटा असल्याचे आणि त्यासाठी त्यांनी विशेष प्रयत्न करावेत, असे आवाहन सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठाचे कुलगुरू डॉ. नितीन करमळकर यांनी केले.

भारतातील नव्हे तर आंतरराष्ट्रीय स्तरावरील ज्वलंत विषय होत चाललेल्या म्हणजेच 'भारतात नागरिकत्व सुधारणा कायद्याची गरज आहे किंवा नाही' या विषयाला जनमत घेणारी कर्मवीर भाऊसाहेब हिरे वादविवाद स्पर्धा नुकतीच पार पडली. यात एस. जी. महाविद्यालय मालेगावने विदेतेपद पटकावले. स्पर्धेच्या पारितोषिक वितरण सोहळ्यात डॉ. करमळकर बोलत होते.

अध्यक्षस्थानी संस्थेचे जनरल सेक्रेटरी डॉ. प्रशांत हिरे उपस्थित होते. प्रमुख पाहुणे म्हणून दैनिक देशोन्नतीचे संपादक प्रकाश पोहरे, महात्मा गांधी विद्यामंदिर संस्थेचे समन्वयक डॉ. अपूर्व हिरे उपस्थित होते. प्रास्ताविक प्राचार्य डॉ. चंद्रकांत दिघावकर त्यांनी केले. तर मान्यवरांचा परिचय उपप्राचार्य डॉ. विनीत रकिबे यांनी केला. सूत्रसंचालन प्रा. डॉ. आर. पी. हिरे यांनी केले. आभार डॉ. एस. डी. पाटील यांनी मानले. व्यासपीठावर सहसचिव डॉ. व्ही. एस मोरे, विश्वस्त डॉ. बी. एस. जगदाळे, डॉ. सुभाष निकम, डॉ. प्रदीप जी. एल., प्राचार्य डॉ. रवींद्र देवरे व स्पर्धेचे समन्वयक डॉ. पी. वाय. व्याळीज उपस्थित होते.

**स्पर्धेचा निकाल पुढीलप्रमाणे :** इंग्लिश भाषा - प्रथम क्रमांक - जानवी पंजाबी (एसएमआरके महाविद्यालय)

■ द्वितीय - करण पारीक (रायसोनी कॉलेज नागपूर)

■ तृतीय - अंकित सावंत (एमपी लॉ कॉलेज औरंगाबाद)

■ चतुर्थ - अर्पिता टिपरीवाला (एसएमआरके नाशिक)

■ हिंदी भाषा : साक्षी मराठे (एसपी महाविद्यालय पुणे)

■ द्वितीय - नाबी हसनं (जामिया यूनिवर्सिटी)

■ तृतीय - मनीष झा (जेएमएस लॉ कॉलेज नोएडा)

■ मराठी भाषा : प्रथम - वृषभ चौधरी (जीएमडी कॉलेज सिन्नर)

■ द्वितीय - महेश अहिरे (एमएसजी महाविद्यालय मालेगाव)

■ तृतीय - प्रसाद जगताप (विद्यावर्धिनी महाविद्यालय धुळे)

Edition
Mar 18, 2020 Page No.
Powered by : eReleGo.com

आपलं महानगर



# हिरे महाविद्यालयात राष्ट्रीय वादविवाद स्पर्धेस प्रारंभ

**आडगाव** ● महात्मा गांधी विद्यामंदिर संचलित लोकनेते व्यंकटराव हिरे महाविद्यालयाच्या वतीने आयोजित आंतरमहाविद्यालयीन राष्ट्रीय स्पर्धेस मंगळवारी प्रारंभ झाला.

स्पर्धेच्या उद्घाटनप्रसंगी महाराष्ट्र टाईम्सचे निवासी संपादक शैलेंद्र तनपुरे यांसह एमजीव्ही संस्थेचे समन्वयक डॉ. अपूर्व प्रशांत हिरे, सहसचिव डॉ. व्ही. एस. मोरे, प्राचार्य डॉ. सी. जी. दिघावकर, विंचूर दळवी महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. रवींद्र देवरे, सिनेट सदस्य डॉ. नंदू पवार व समन्वयक डॉ. पी. वाय व्याळीज उपस्थित होते. डॉ. अपूर्व हिरे यांनी स्पर्धा आयोजनाचा उद्देश स्पष्ट केला. जनतेच्या मुखातील ज्वलंत विषयावर चर्चा व्हावी व आजच्या युवकांचे या विषयावर जाणून घेता यावेत, यासाठी हा विषय व उपक्रम महत्त्वाचा असल्याचे ते म्हणाले. प्राचार्य डॉ. दिघावकर यांनी प्रमुख पाहुण्यांचे स्वागत केले.

स्पर्धेचे समन्वयक डॉ. पी. वाय व्याळीज यांनी नियम स्पष्ट केले. स्पर्धेत दिल्ली, उत्तर प्रदेश तसेच इतर राज्यांतून विविध महाविद्यालयांचे १२० विद्यार्थी सहभागी झाली आहेत. उपप्राचार्य डॉ. विनीत रकिबे यांनी परिचय करून दिला. परीक्षा नियंत्रक म्हणून प्राचार्य डॉ. अंजली कुलकर्णी, डॉ. राहुल पाटील, डॉ. गणेश शेकोकर हे काम पाहात आहेत. डॉ. रवींद्र हिरे यांनी सूत्रसंचालन केले. तर आभार डॉ.किशोर निकम यांनी मानले. याप्रसंगी उपप्राचार्य डॉ. संतोष चोबे, डॉ. एस. डी. पाटील, डॉ. सुचेता सोनवणे, प्रा. के. एन. पाटील, प्रा. जे. एन. सोनावणे, सर्व पदाधिकारी, प्राचार्य, विभागप्रमुख, प्राध्यापक, शिक्षकेतर कर्मचारी व विद्यार्थी उपस्थित होते.

Edition
Mar 11, 2020 Page No.
Powered by : eReleGo.com

सकाळ

# आंतरमहाविद्यालयीन वादविवाद स्पर्धेचे उद्‌घाटन

## विविध महाविद्यालयांतील १२० स्पर्धक सहभागी

**सकाळ वृत्तसेवा**

पंचवटी, ता. १० : महात्मा गांधी विद्यामंदिर संचालित लोकनेते व्यंकटराव हिरे महाविद्यालयाच्या प्रांगणात आजपासून दोनदिवसीय राष्ट्रीय आंतरमहाविद्यालयीन वादविवाद स्पर्धेला प्रारंभ झाला. देशभरातील विविध महाविद्यालयांतील १२० स्पर्धक सहभागी झाले आहेत. अंतिम निकाल बुधवारी (ता. ११) सायंकाळी जाहीर करण्यात येईल.

लोकनेते व्यंकटराव हिरे महाविद्यालयातर्फे दोनदिवसीय आंतरमहाविद्यालयीन वादविवाद स्पर्धेचे आयोजन करण्यात आले आहे. पत्रकार शैलेंद्र तनपुरे यांच्या हस्ते उद्‌घाटन झाले. या वेळी संस्थेचे समन्वयक डॉ. अपूर्व हिरे, संस्थेचे सहसचिव डॉ. व्ही. एस. मोरे, प्राचार्य डॉ. सी. जी. दिघावकर, विंचूर दळवी महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. रवींद्र देवरे, सिनेट सदस्य डॉ. नंदू पवार व समन्वयक डॉ. पी. वाय. व्याळीज आदी उपस्थित होते.

डॉ. अपूर्व हिरे यांनी स्पर्धा आयोजनाचा हेतू स्पष्ट केला. जनतेच्या मुखातला ज्वलंत विषयावर चर्चा व्हावी व आजच्या युवकांचे या विषयावर काय वाटते हे जाणून घेणे तितकेच महत्त्वाचे आहे. नवभारत घडविणारे विविध क्षेत्रांतील नेतृत्व पुढे आणण्यात सदर स्पर्धेचे योगदान असल्याचे सांगितले. प्राचार्य डॉ. सी. जी. दिघावकर यांनी उपस्थित प्रमुख पाहुण्यांचे स्वागत करून प्रास्ताविक केले. डॉ. अपूर्व प्रशांत हिरे यांच्या हस्ते मान्यवरांचा सत्कार करण्यात आला. समन्वयक डॉ. पी. वाय. व्याळीज यांनी स्पर्धेचा हेतू, संकल्पना व स्पर्धेचे नियम विशद केले. उपप्राचार्य डॉ. विनीत रकिबे यांनी पाहुण्यांचा परिचय करून दिला. डॉ. रवींद्र हिरे यांनी सूत्रसंचालन केले. डॉ. किशोर निकम यांनी आभार मानले.

याप्रसंगी उपप्राचार्य डॉ. संतोष चोबे, विज्ञान शाखाप्रमुख डॉ. एस. डी. पाटील, कनिष्ठ विभागाच्या पर्यवेक्षिका डॉ. सुचेता सोनवणे, प्रा. के. एन. पाटील, प्रा. जे. एन. सोनावणे, संस्थेचे पदाधिकारी, प्राचार्य, विभागप्रमुख, प्राध्यापक, शिक्षकेतर कर्मचारी व विद्यार्थी मोठ्या संख्येने उपस्थित होते. बुधवारी (ता. ११) सायंकाळी स्पर्धेचा निकाल जाहीर करण्यात येईल.

Nashik, Nashik-Today
11/03/2020 Page No. 6

**मोडी लिपी प्रमाणपत्र वाटप** • हिरे महाविद्यालयात डॉ. अंजली वेखंडे यांचे प्रतिपादन

# वैभवशाली इतिहास समजण्यासाठी मोडी लिपीचे संवर्धन अन् ती शिकणे गरजेचे

**प्रतिनिधी** | नाशिक

मोडी लिपीला जवळपास नऊशे वर्षांचा इतिहास आहे. मराठ्यांचा वैभवशाली इतिहास व्यवस्थित समजून घ्यायचा असेल तर मोडी लिपी वाचता येणे हे खूप महत्त्वाचे आहे. इतिहासकाळातील मोडी लिपीतले असंख्य दस्तावेज धूळखात पडून आहेत. गौरवशाली इतिहास परिपूर्ण समजण्यासाठी मोडी लिपीचे संवर्धन होणे व ती शिकणे गरजेचे असल्याचे प्रतिपादन प्रमुख पाहुण्या डॉ. अंजली वेखंडे यांनी पंचवटी येथील लोकनेते व्यंकटराव हिरे कला, विज्ञान व वाणिज्य, महाविद्यालयात इतिहास विभागांतर्गत मोडी लिपी प्रमाणपत्र वाटप कार्यक्रमात केले.

अध्यक्षस्थानी प्राचार्य डॉ. सी. जी. दिघावकर, तर व्यासपीठावर विंचूर दळवी, महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. रवींद्र देवरे, उपप्राचार्य डॉ. विनीत रकिबे, कला व वाणिज्य शाखाप्रमुख डॉ. किशोर निकम, इतिहास विभागप्रमुख डॉ. प्रगती मारकवार यांची प्रमुख उपस्थित होती. डॉ. अंजली वेखंडे म्हणाल्या की, आजमितीस महाराष्ट्रात फार कमी प्रमाणात मोडी लिपी जाणणारे तज्ज्ञ आहेत. त्यामुळे विद्यार्थ्यांनी या क्षेत्रात येऊन मोडी लिपी शिकली पाहिजे व तिचे संवर्धन केले पाहिजे. पेशवे दप्तरात मोडी कागदपत्रांचे असंख्य रुमाल धूळखात पडलेले आहेत. मोठ्या संख्येने मोडी जाणकार निर्माण झाल्यावरच अशाप्रकारची कागदपत्रे वाचली जाऊ शकतील व यातून मराठा साम्राज्याचा खरा इतिहास समाजापुढे येईल.



हिरे महाविद्यालयात मोडी लिपी प्रमाणपत्र वाटपप्रसंगी विद्यार्थी. सोबत डॉ. अंजली वेखंडे तसेच शिक्षक.

प्रास्ताविक इतिहास विभाग प्रमुख व मोडी लिपी कार्यशाळेच्या समन्वयिका डॉ. प्रगती मारकवार यांनी केले. आपल्या प्रास्ताविकेत मोडी लिपी सर्टिफिकेट कोर्स सुरू झाल्यापासून आजपर्यंत शेकडो विद्यार्थ्यांनी मोडी लिपी आत्मसात केली. या लिपीचे महत्त्व महाविद्यालयीन विद्यार्थ्यांमध्ये रुजावे या उद्देशाने हा कोर्स सुरू करण्यात आल्याचे त्या म्हणाल्या. कार्यशाळेच्या माध्यमातून राबविण्यात येणाऱ्या विविध उपक्रमांची माहितीही यावेळी त्यांनी दिली.

आपल्या अध्यक्षीय मनोगतात प्राचार्य डॉ. सी. जी. दिघावकर म्हणाले की, आपले महाविद्यालय विद्यार्थ्यांच्या कलागुणांना वाव देण्यासाठी असे नावीन्यपूर्ण कार्यक्रम आयोजित करत असते. मोडी लिपी आत्मसात करणे व अधिकाधिक मोडी जाणकार निर्माण करणे हे अशा कार्यक्रमाद्वारे घडत असल्याचे त्यांनी नमूद केले व इतिहास विभाग आयोजित करत असलेल्या अशा कार्यक्रमांचे कौतुकदेखील केले.

विद्यार्थ्यांनी मोडी लिपीमध्ये जे यश संपादन केले त्यानिमित्त त्यांना प्रमाणपत्र वाटप करण्यात आले. सूत्रसंचालन प्रा. गोरख शेवाळे यांनी केले. प्रमुख अतिथी परिचय प्रा. अर्चना गायकवाड यांनी करून दिला. याप्रसंगी महाविद्यालयातील प्राध्यापक, शिक्षकेतर कर्मचारी व विद्यार्थी बहुसंख्येने उपस्थित होते.

# हिरे महाविद्यालयात गांधीयन स्टडीज प्रमाणपत्र वाटप

**पंचवटी :** लोकनेते व्यंकटराव हिरे कला, विज्ञान व वाणिज्य, महाविद्यालयाच्या इतिहास विभागांतर्गत गांधीयन स्टडीज सेंटर महात्मा गांधींच्या विचार व कार्याची तसेच त्यांनी अंगीकारलेल्या उदात्त जीवन मूल्यांची माहिती महाविद्यालयीन विद्यार्थ्यांना व्हावी, या उद्देशाने सतत नावीन्यपूर्ण कार्यक्रम राबवित असते.

यावर्षी गांधींच्या जीवनपटावर आधारित निबंध व वक्तृत्व स्पर्धेचे आयोजन करण्यात आले होते. या दोन्ही स्पर्धांमध्ये विद्यार्थ्यांनी उत्स्फूर्त सहभाग नोंदविला. यावेळी प्रावीण्य मिळविलेल्या विद्यार्थ्यांचा मान्यवरांच्या हस्ते प्रमाणपत्र वाटप करण्यात आले. यावेळी महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. सी. जी दिघावकर, विंचूर दळवी महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. रवींद्र देवरे, डॉ. अंजली वेखंडे, उपप्राचार्य डॉ. विनीत रकिबे, कला व वाणिज्य शाखाप्रमुख डॉ. किशोर निकम, इतिहास विभागप्रमुख डॉ. प्रगती मारकवार आदी उपस्थित होते. प्रा. गोरख शेवाळे यांनी सूत्रसंचालन केले.

प्रा. अर्चना गायकवाड यांनी मान्यवरांच्या परिचय करून दिला. प्रास्ताविक व इतिहास विभागप्रमुख डॉ. प्रगती मारकवार यांनी केले. याप्रसंगी महाविद्यालयातील प्राध्यापक, शिक्षकेतर कर्मचारी व विद्यार्थी उपस्थित होते.

पुढारी

# हिरे महाविद्यालयात वादविवाद स्पर्धा

**पंचवटी : पुढारी वृत्तसेवा**

महात्मा गांधी विद्यामंदिर संचलित लोकनेते व्यंकटराव हिरे कला, वाणिज्य व विज्ञान महाविद्यालयात दि. १० व ११ रोजी राष्ट्रीय आंतरमहाविद्यालयीन वादविवाद स्पर्धेचे आयोजन करण्यात आले आहे मराठी, हिंदी व इंग्रजी अशा तीन भाषांतून ही स्पर्धा होणार आहे. 'भारतात नागरिकत्व सुधारणा कायद्याची आवश्यकता आहे किंवा नाही' हा स्पर्धेचा विषय आहे. प्रथम तीन क्रमांकासाठी अनुक्रमे ५० हजार, २५ हजार व ११ हजार अशी रोख पारितोषिके असून, प्रत्येक भाषेतील पहिल्या पाच स्पर्धकांचा पाच हजार, तीन हजार, दीड हजार, एक हजार व पाचशे रुपयांचे पारितोषिक, प्रमाणपत्र आणि सन्मानचिन्ह देऊन गौरव करण्यात येणार आहे. कार्यक्रमाचे उद्घाटन ज्येष्ठ पत्रकार शैलेंद्र तनपुरे यांच्या प्रमुख उपस्थितीत आणि पारितोषिक वितरण समारोप पुणे विद्यापीठाचे कुलगुरू डॉ. नितीन करमाळकर, ज्येष्ठ पत्रकार प्रकाश पोहरे, डॉ. प्रशांत हिरे, समन्वयक डॉ. अपूर्व हिरे, विश्वस्त डॉ. अद्वय हिरे यांच्या उपस्थितीत होणार आहे. स्पर्धेत भाग घेऊ इच्छिणाऱ्या स्पर्धकांनी महाविद्यालयाशी संपर्क साधावा, असे आवाहन महात्मा गांधी विद्यामंदिर संस्थेचे सरचिटणीस डॉ. प्रशांत हिरे, समन्वयक डॉ. अपूर्व हिरे, प्राचार्य डॉ. सी. जी. दिघावकर व स्पर्धा समन्वयक डॉ. पी. वाय. व्याळीज यांनी केले आहे.

# पंचवटी महाविद्यालयात उद्या वाद-विवाद स्पर्धा

## नागरिकत्व दुरुस्ती कायद्यावरुन होणार चर्चा

**प्रतिनिधी** | नाशिक

देशातील सुरक्षिततेच्या दृष्टीने नागरिकत्व (दुरुस्ती) विधेयकाला अलीकडेच संसदेच्या दोन्ही सभागृहांनी मान्यता दिली असून त्यांचे रूपांतर नागरिकत्व दुरुस्ती कायद्यात झाले आहे. हा कायदा संसदेत मंजूर झाल्यापासून देशभरात विविध ठिकाणी हिंसाचार झाल्याच्या घटनाही घडल्या आहेत. या ज्वलंत विषयावर चर्चा करण्यासाठी तसेच युवा पिढीचे मते जाणून घेण्यासाठी पंचवटी महाविद्यालयात येत्या १० व ११ मार्च रोजी आंतर महाविद्यालयीन वाद विवाद स्पर्धेचे आयोजन करण्यात आले आहे. 'नागरीकत्व सुधारणा कायद्याची आवश्यकता आहे की नाही' या विषयावर राष्ट्रीय स्तरावरील वाद विवाद स्पर्धा होणार आहे.

इंग्रजी अशा तीन भाषांतून होणार असून प्रथम तीन क्रमांकासाठी अनुक्रमे पन्नास हजार, पंचवीस हजार व अकरा हजार अशी रोख पारितोषिक असून प्रत्येक भाषेतील पहिल्या पाच स्पर्धकांना पारितोषिक, प्रमाणपत्र आणि सन्मानचिन्ह देऊन गौरविण्यात येणार आहे. सर्वोत्कृष्ट संघास कर्मवीर भाऊसाहेब हिरे चषक देण्यात येईल. उद्घाटनासाठी दैनिक महाराष्ट्र टाइम्सचे संपादक प्रमुख शैलेंद्र तनपुरे यांच्या प्रमुख उपस्थितीत आणि पारितोषिक वितरण समारोपास सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठाचे कुलगुरु डॉ. नितीन आर. करमळकर, प्रकाश पोहरे, महात्मा गांधी विद्यामंदीर संस्थेचे सरचिटणीस डॉ. प्रशांत हिरे, समन्वयक अपूर्व हिरे, विश्वस्त डॉ. अद्वय प्रशांत हिरे-पाटील उपस्थित राहणार आहेत.

स्पर्धेत सहभाग घेऊ इच्छिणाऱ्या स्पर्धकांनी ९९६०४२९६२७ या

https://epaperdivyamarathi.bhaskar.com/nashik-city/248/DATEHERE/0/2/

दै० सकाळ दि० 2/03/2020

दै० सकाळ दि० 2/03/2020



पंचवटी : कर्मवीर भाऊसाहेब हिरे यांच्या ११५ व्या जयंतीचे औचित्य साधत लोकनेते हिरे महाविद्यालयात आदरांजली वाहताना प्राचार्य डॉ. चंद्रकांत दिघावकर आदी.

# कर्मवीर भाऊसाहेब हिरे राज्याचे विकासमहर्षी

डॉ. दिघावकर : ११५ व्या जयंतीनिमित्त हिरे महाविद्यालयात अभिवादन

**सकाळ वृत्तसेवा**

पंचवटी, ता. १ : 'विनासहकार-नाही उद्धार' या उक्तीला न्याय देताना कर्मवीर भाऊसाहेब हिरे यांनी सहकार तत्त्वाच्या माध्यमातून विकासाचा ध्यास घेत समाजकारण केले. बहुजन समाजाच्या उत्कर्षासाठी मोठे समाजकार्य उभारणारे कर्मवीर भाऊसाहेब खऱ्या अर्थाने राज्याचे विकासमहर्षी आहेत, असे प्रतिपादन लोकनेते व्यंकटराव हिरे महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. चंद्रकांत दिघावकर यांनी रविवारी (ता. १) केले.

लोकनेते व्यंकटराव हिरे महाविद्यालयात कर्मवीर भाऊसाहेब हिरे यांची ११५ वी जयंती साजरी झाली. त्या वेळी प्रसंगी डॉ. दिघावकर यांनी बहुजन समाजाच्या उत्कर्षासाठी त्यांनी विकासाचे समाजकार्य केल्याचे सांगितले. महाविद्यालयात कार्यक्रमाची सांगता झाल्यानंतर महापालिकेच्या नेहरू गार्डन येथील कर्मवीर भाऊसाहेब हिरे यांच्या पुतळ्याला प्राचार्य डॉ. चंद्रकांत दिघावकर यांच्या हस्ते हार अर्पण करून अभिवादन करण्यात आले.

प्रा. डॉ. किरण पिंगळे यांनी प्रास्ताविक केले. सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठाचे सिनेट सदस्य डॉ. नंदू पवार, उपप्राचार्य डॉ. विनीत रकिबे, डॉ. संतोष चोबे, कला व वाणिज्य शाखाप्रमुख डॉ. किशोर निकम, विज्ञान शाखाप्रमुख डॉ. एस. डी. पाटील, व्होकेशनल विभागाचे उपप्राचार्य प्रा. जे. एन. सोनवणे, पर्यवेक्षिका प्रा. डॉ. सुचिता सोनवणे, प्रा. के. एन. पाटील, गोविंद देशमुख, शिक्षकेतर कर्मचारी व विद्यार्थी उपस्थित होते.

दै० दिव्यमराठी दि० 2/03/2020

**दिव्य मराठी विशेष** • डॉ. दिघावकर यांचे प्रतिपादन, भाऊसाहेब हिरे जयंतीनिमित्त व्याख्यान

# विकासाचा ध्यास घेत हिरेंचे समाजकारण



**प्रतिनिधी** | नाशिक

'विना सहकार - नाही उध्दार' या उक्तीला न्याय देताना कर्मवीर भाऊसाहेब हिरे यांनी सहकार तत्त्वाच्या माध्यमातून विकासाचा ध्यास घेत समाजकारण केले, असे प्रतिपादन प्राचार्य डॉ. सी. जी. दिघावकर यांनी केले.

एक मार्च रोजी लोकनेते व्यंकटराव हिरे महाविद्यालयात कै. कर्मवीर भाऊसाहेब हिरे यांची ११५ वी जयंती साजरी करण्यात आली. याप्रसंगी डॉ. दिघावकर बोलत होते. बहुजन समाजाच्या उत्कर्षासाठी त्यांनी विकासाचे समाजकार्य केले. शिक्षण व सहकार महर्षी कर्मवीर भाऊसाहेब हिरे यांची संपूर्ण महाराष्ट्राला ओळख होते ती कुळ कायदयाच्या घोषणेवरून 'कसेल त्याची जमिन राहिल त्यांचे घर' 'काम करेल त्याचा कारखाना' या घोषणेमळे महाराष्ट्रातील कष्टकरी वर्गाला खऱ्या अर्थाने न्याय मिळवुन दिला, असे त्यांनी यावेळी नमूद केले.

महाविद्यालयात कार्यक्रमाची सांगता झाल्यानंतर नेहरू गार्डन येथील कर्मवीर भाऊसाहेब हिरे यांच्या पुतळ्याला प्राचार्य डॉ. दिघावकर यांच्या हस्ते पुष्पहार अर्पण करून अभिवादन करण्यात आले. प्रास्ताविक प्रा. डॉ. किरण पिंगळे यांनी केले. याप्रसंगी पुणे विद्यापीठाचे सिनेट सदस्य डॉ. नंदू पवार, उपप्राचार्य डॉ. विनीत रकिबे डॉ. संतोष चोबे, कला व वाणिज्य शाखाप्रमुख डॉ. किशोर निकम, विज्ञान शाखाप्रमुख डॉ. एस. डी. पाटील, व्होकेशनल विभागाचे उपप्राचार्य प्रा. जे. एन. सोनवणे, पर्यवेक्षिका प्रा. डॉ. सुचिता सोनवणे, प्रा. पाटील, गोविंद देशमुख, सर्व विभाग प्रमुख, प्राध्यापक, शिक्षकेतर कर्मचारी व विद्यार्थी उपस्थित होते

## सायको क्वीझ काँन्टेस्टमध्ये हिरे महाविद्यालयाचे यश

नाशिक | एच. पी. टी. महाविद्यालयाच्या वतीने राज्यस्तरीय अंकुर फेस्टिव्हलचे आयोजन करण्यात आले. फेस्टिव्हल अंतर्गत 'सायको क्वीझ काँन्टेस्ट' झाली. मानसशास्त्र विषयाच्या अनेक विद्यार्थ्यांनी स्पर्धेत सहभाग नोंदवला. मानसशास्त्रीय संकल्पनेवर आधारित स्पर्धेचे पाच राउंड झाले. लोकनेते व्यंकटराव हिरे महाविद्यालयातील मानसशास्त्र विभाग आणि संशोधन केंद्रातील विद्यार्थ्यांच्या दोन संघांनी या स्पर्धेत सहभागनोंदवला. महाविद्यालयाच्या निमरा पठाण आणि प्रियंका नाईक यांच्या संघास प्रथम तर ऋषिकेश सपके आणि पंकज भामरे यांच्या संघास दुसरे पारितोषिक मिळाले. समन्वयक प्रा. डॉ. मृणाल भारद्वाज यांचे मार्गदर्शन लाभले. प्राचार्य डॉ. चंद्रकांत दिघावकर, उपप्राचार्य डॉ. विनीत रकिबे, प्रा. डॉ. मृणाल भारद्वाज, अश्विनी केदारे, रूपाली खैरनार व अजय ठाकरे यांनी विद्यार्थ्यांचे अभिनंदन केले.

**लोकमत**

## 'सायको क्विज' स्पर्धेत 'एलव्हीएच'चे यश

लोकमत न्यूज नेटवर्क

**नाशिक** : एचपीटी महाविद्यालयात पार पडलेल्या राज्यस्तरीय अंकुर फेस्टिव्हलमध्ये लोकनेते व्यंकटराव हिरे महाविद्यालयाच्या मानसशास्त्र विभागाच्या विद्यार्थ्यांनी 'सायको क्वीज' स्पर्धेत बाजी मारली.

या स्पर्धेत विभागप्रमुख समन्वयक डॉ. मृणाल भारद्वाज यांच्या मार्गदर्शनाखाली विद्यार्थ्यांनी सहभाग घेत यश मिळविले. हिरे महाविद्यालयाच्या मानसशास्त्र विभाग आणि संशोधन केंद्रातील विद्यार्थ्यांच्या दोन संघांनी सहभाग घेतला होता. यामध्ये निमरा पठाण, प्रियंका नाईक यांच्या संघाने प्रथम क्रमांक मिळविला. तसेच ऋषिकेश सपके, पंकज भामरे यांच्या संघाने द्वितीय स्थान राखले. विजेत्या संघांना प्राचार्य डॉ. चंद्रकांत दिघावकर, उपप्राचार्य डॉ. विनित रकिबे यांच्या हस्ते प्रमाणपत्र देण्यात आले.

Hello Nashik
Page No. 3 Mar 03, 2020
Powered by: erelego.com

दै० सकाळ
दि० 3/3/2020

दै० सकाळ दि. 3/3/20

## सायको क्वीझ कॉन्टेस्टमध्ये हिरे महाविद्यालयाचे वर्चस्व

पंचवटी, ता. २ : एचपीटी महाविद्यालयातर्फे झालेल्या राज्यस्तरीय अंकुर फेस्टिव्हलमधील 'सायको क्वीझ कॉन्टेस्ट'मध्ये हिरे महाविद्यालयाच्या संघाने प्रथम आणि द्वितीय क्रमांक पटकावत आपले वर्चस्व राखले. महाराष्ट्रातील अनेक महाविद्यालयांनी सहभाग घेतला. मानसशास्त्र विषयाच्या अनेक विद्यार्थ्यांनी स्पर्धेत सहभाग नोंदवला. स्पर्धेत महाविद्यालयातील मानसशास्त्र विभाग आणि संशोधन केंद्रातील विद्यार्थ्यांच्या दोन संघांनी या स्पर्धेत सहभाग नोंदवला आणि निर्विवाद वर्चस्व मिळवले. निमरा पठाण आणि प्रियंका नाईक यांच्या संघास प्रथम, तर हर्षीकेश सपके आणि पंकज भामरे यांच्या संघास दुसरे पारितोषिक मिळाले. मानसशास्त्रीय संकल्पनेवर आधारित या स्पर्धेचे एकूण पाच राउंड झाले. मानसशास्त्र विभागप्रमुख व संशोधन केंद्राच्या समन्वयक प्रा. डॉ. मृणाल भारद्वाज यांच्या मार्गदर्शनाखाली या संघाने हे यश मिळवले. या यशाबद्दल प्राचार्य डॉ. चंद्रकांत दिघावकर, उपप्राचार्य डॉ. विनीत रकिबे, अश्विनी केदारे, रूपाली खैरनार व अजय ठाकरे यांनी अभिनंदन केले.

**lokmat Times**

# Convocation ceremony of MGVM's colleges concludes



### Students from colleges across Nashik, Malegaon, Satana, Yeola receive their degrees

**LOKMAT NEWS NETWORK**
NASHIK, FEB 5

The convocation ceremony of students who have completed their degree courses in the colleges under the Savitribai Phule Pune University affiliated Mahatma Gandhi Vidya Mandir (MGVM) across Nashik, Yeola, Malegaon and Satana, recently concluded at the Parshuram Saikhedkar Natyagruh, Nashik.

The chief guest was dean of Commerce and Management department of Savitribai Phule Pune University Dr Parag Kalkar. While addressing the cremony he gave information regarding the new curriculum of the Pune University and appreciated the efforts of MGVM for running the colleges fluently. The students shall receive a secure future when they pass out from an affiliated university. It is important to create a generation of students who are outcome of quality education, he added.

Similarly, the students too shall keep their perspective clear and work towards the development of self. The students shall remain updated and must plan accordingly for their future career. The president of the programme Dr Apurva Hire congratulated all the students and expressed his views and gave a message to the students. The programme began with a procession and songs were played. Over 130 students from Arts, Commerce, Science, Management and Pharmacy who completed their course were felicitated and given their degrees as a symbol of the completion of their courses in their respective colleges in hands of the dignitaries. The students took an oath during the ceremony. Various members of the organisation and colleges along with the students were present.

Nashik First
Page No. 3 Feb 06, 2020
Powered by: erelego.com

**पदवीप्रदान समारंभ** • पुणे विद्यापीठाचे अधिष्ठाता डॉ. पराग काळकर यांचे मनोगत

# उज्ज्वल भविष्यासाठी विद्यार्थ्यांनी नवीन तंत्रज्ञानात अद्ययावत असणे आवश्यक




## नाशिक, मालेगाव, येवला, सटाणा येथील विद्यार्थ्यांचा कार्यक्रमात समावेश

**प्रतिनिधी** | नाशिक

### पदवीप्राप्त विद्यार्थ्यांची मिरवणूक

कार्यक्रमाच्या प्रारंभी पदवीप्राप्त विद्यार्थ्यांची विद्यापीठ संहितेप्रमाणे मिरवणूक काढण्यात आली. सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठ गीताने कार्यक्रमाची सुरुवात झाली. पदवी अधिग्रहण समारंभासाठी वाणिज्य, कला, विज्ञान, मॅनेजमेंट आणि फार्मसी या सर्व शाखांतून १३० विद्यार्थ्यांना प्रमुख अतिथींच्या हस्ते तसेच कार्यक्रमाच्या अध्यक्षांच्या हस्ते प्रमाणपत्रांचे वाटप करण्यात आले.

बदल स्वीकारायला हवेत. कारण बदल हा निसर्गाचा नियम आहे. या बदलाचा विचार करता उज्ज्वल भविष्यासाठी नवीन तंत्रज्ञानात अद्ययावत असणे गरजेचे आहे, असे प्रतिपादन पुणे विद्यापीठाच्या वाणिज्य आणि व्यवस्थापन विभागाचे अधिष्ठाता डॉ. पराग काळकर यांनी पदवीप्रदान सोहळ्याप्रसंगी केले.

पुणे येथील सावित्रीबाई फुले विद्यापीठ आणि महात्मा गांधी विद्यामंदिर संचलित संस्थेच्या नाशिक, मालेगाव, येवला, सटाणा येथील सर्व महाविद्यालयांचा पदवीग्रहण समारंभ नुकताच झाला. प्रमुख पाहुणे म्हणून डॉ. काळकर बोलत होते. कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी डॉ. अपूर्व हिरे होते. व्यासपीठावर संस्थेचे सहसचिव डॉ. व्ही. एस. मोरे, प्राचार्य बी. एस. जगदाळे, विश्वस्त राजेश शिंदे, डॉ. प्रदीपजी, संचालक प्रा. डॉ. सुभाष निकम, सुजाता शिंदे, श्याम भंडारी उपस्थित होते.

डॉ. काळकर यांनी पुणे विद्यापीठाच्या नवीन अभ्यासक्रमाबाबत माहिती दिली. सोबतच उच्च शिक्षणामधील संस्थेच्या कार्याचे कौतुक केले तसेच डिग्री म्हणजे परफॉर्मिंग आर्ट असून जास्तीत जास्त विद्यार्थ्यांकडे विद्यापीठाच्या अद्ययावत अभ्यासक्रमातून पदवी असणे तसेच विद्यापीठांच्या सहयोगाने सुशिक्षित तरुणांची फळी तयार होणे गरजेचे असल्याचे सांगितले. विद्यार्थ्यांनी नेहमीच व्यावहारिक दृष्टिकोन तसेच स्वयंरोजगाराचे ध्येय ठेवून काम करणे गरजेचे आहे. सध्या तंत्रज्ञानात नवीन नवीन बदल होत आहे, ते बदल आत्मसात करून विद्यार्थ्यांनी योग्य दिशा ठेवून स्वतःला भरकटू न देता आपले भविष्य उज्ज्वल करावे, त्यासोबत आपले आपल्या कुटुंबियांप्रतिसुद्धा दायित्व असून उच्चशिक्षित झाल्यावर कुटुंबाची काळजी घेणे महत्त्वाचे आहे, असेही डॉ. काळकर यांनी आवर्जून सांगितले.

भारत हा तरुणांचा देश म्हणून किमान पुढील १५ वर्षे तरी जगावर अधिराज्य करणार आहे. यामुळे आपल्या तरुणांना पुढील पंधरा ते वीस वर्षे भारतातच नव्हे तर जगातसुद्धा अनेक संधी उपलब्ध आहेत. याच गोष्टी लक्षात ठेवून विद्यार्थ्यांनी नवीन आव्हाने पेलण्यास सक्षम होऊन या संधीचा लाभ घ्यावा, असे आवाहन डॉ पराग काळकर यांनी केले. प्रास्ताविक संस्थेचे सहसचिव डॉ. व्ही. एस. मोरे त्यांनी केले. प्रमुख अतिथींचा परिचय शुभांगी पवार यांनी केला. प्रा. डॉ. जगदाळे त्यांनी आभार मानले. सूत्रसंचालन प्रा. शुभांगी पवार यांनी केले. कार्यक्रमाची सांगता राष्ट्रगीताने झाली.